# पत्रकारांच्या हिताच्या चळवळीला स्थानिक वृत्तपत्रांचे पाठबळ



# पत्रकारांच्या वेदनांचा हुंकार!

जळगाव येथील पत्रकार किशोर पाटील यांनी पत्रकाराचं जगणं कवितेतून मांडले तेव्हा उपस्थित शंभरपेक्षा अधिक पत्रकारांच्या डोळ्यात पाणी तरळले. अमरावतीत काहींनी, पत्रकार जेव्हा आजारी पडतो, अपघात होतो तेव्हा त्याची कुटुंबाची अवस्था बिकट होते हे सांगताना प्रामाणिकपणे काम करून पदरी काय तर पश्चाताप हे समोर आणलं. महानगरात काम करणाऱ्या नामवंत पत्रकारांनाही जिल्हा, तालुका, गाव पातळीवरील पत्रकारांचे काहीच सोयरसुतक नाही. त्यामुळे लोकशाही व्यवस्थेत चौथा स्तंभ म्हणून मानल्या जाणाऱ्या क्षेत्रातील सामान्य पत्रकारांच्या वेदनांचा हुंकार संवाद यात्रेतून जागोजागी बाहेर पडला.

भारताच्या इतिहासात पहिल्यांदाच समाजाचे प्रश्न मांडणाऱ्या स्थानिक माध्यमांच्या मागण्यांसाठी दीक्षाभूमी ते मंत्रालय पत्रकार संवाद यात्रा २८ जुलै २०२४ ला नागपूर येथून सुरूवात झाली. सरचिटणीस विश्वास आरोटे आणि कार्याध्यक्ष यात्रा संयोजक प्रवीण सपकाळे यांच्या नियोजनात पहिल्याच दिवशी विविध पन्नास सामाजिक संघटनांनी पत्रकारांच्या न्याय मागण्यांना पाठिंबा दिला.लोकशाही व्यवस्थेत पत्रकार प्रमुख घटक असला तरी या घटकाची अवस्था काय? कोरोनानंतर वृत्तपत्रांचा खप कमी झाला. अनेक वृत्तपत्रांनी आवृत्त्या बंद केल्या. स्थानिक पातळीवरील वृत्तपत्रांना मिळणाऱ्या जाहिराती कमी झाल्या. परिणामी उत्पादन खर्च आणि विक्री किंमत यातील तफावतीने वृत्तपत्र चालवणे कठीण झाले. त्यामुळे दहा-वीस वर्षे काम केलेल्या पत्रकारांना नोकरी गमवावी लागली. तर कामावर असणाऱ्यांना अत्यंत कमी पगारात काम करण्याची वेळ आली आहे. ग्रामीण भागातील वार्ताहरांना तर आता मानधन मिळणेही बंद झाले आहे. वृत्तवाहिण्यात काम करणाऱ्या पत्रकारांना पुर्वी स्टोरीवर मानधन मिळत असे आता बातम्यांचा कोठा देवून त्यांना कोणत्याही सुविधा न देता राबवले जाते. हे वास्तव जागोजागी पत्रकारांनी मांडले.

प्रत्येक उत्पादनाची किंमत (एमआरपी) ठरविण्याचे धोरणे आहेत. मग वर्तमानपत्रांचे काय? असेही प्रश्न समोर आले. मध्यंतरी मोठ्या वृत्तसमुहाने स्वस्तात देण्याची स्पर्धा सुरू केल्याने जिल्हा, तालुका, गावपातळीवरील वर्तमानपत्रे आणि पत्रकार अडचणीत आले. इतर कर्मचाऱ्यांवर बेकारीची कुऱ्हाड कोसळली. सर्वच माध्यमातील पत्रकार विविध समस्यांनी त्रस्त झाले आहेत. मात्र समाजाचे प्रश्न मांडणाऱ्या या पत्रकारांना आपल्या समस्या मांडण्यासाठी आपल्याच माध्यमात जागा नाही. प्रामाणिकपणे काम करणाऱ्या पत्रकाराला सुरूवातीला आमिष दाखवून जवळ घेतले जाते अन्यथा माध्यम समुहच विकत घेवून खरे लिहिणाऱ्या पत्रकाराला बाजूला केले जाते.  बातमी छापली किवा प्रसिध्द केल्यानंतर आक्षेप असेल तर न्यायालयात दाद मागितली पाहिजे पण अलीकडे थेट फौजदारी गुन्हे दाखल करून पत्रकारांचा छळ केला जात आहे आणि काही ठराविक वर्ग जाणीवपूर्वक काही घटनांना समोर करून संपूर्ण माध्यम क्षेत्रालाच बदनाम करण्याचा प्रयत्न करतात. माध्यमातील ज्येष्ठ वरिष्ठही वस्तुस्थिती न पाहता उपदेशाचे डोस पाजून मोकळे होतात हे वास्तव स्थानिक पातळीवरील पत्रकारांनी आपल्या व्यथांमधून मांडले. कोणत्याही व्यवस्थेला प्रश्न विचारणारे, खरे बोलणारे नको असतात, बरे बोलणारे, स्तुती करणारे गोड लागतात. अलीकडे तर सर्वच राजकीय नेते आणि कार्यकर्त्यांनी पत्रकारितेतीलच अनेकांना नोकरीला ठेवून पीआर निर्माण केला आहे. त्यामुळे त्यांना सर्वच माध्यम आणि पत्रकार आपल्याबरोबर आहेत असा भास होतो. परिणामी राज्यकर्ते आणि राजकारण्यांनी एकतर्फी संवाद सुरू करून प्रतिवाद आणि सर्वकष संवादाची पध्दतच कमी केली आहे. पत्रकार समाजातील प्रमुख घटक आहे आणि देशभरात 35 हजार कोटीपेक्षा मोठा व्यवसाय असल्याने यावर लाखो लोकांचे रोजगार आता अवलंबून आहे. हे लक्षात घेवून सरकारने या क्षेत्रालाही आर्थिक पातळीवर सक्षम करण्यासाठी धोरणात्मक निर्णय घेतला पाहिजे.मतपेटीचा विचार करूनच सरकार कोणत्याही घटकाला न्याय देण्याची मानसिकता ठेवत असेल तर प्रत्येक पत्रकार मतांचा गठ्ठा आहे हे आता पत्रकार सांगु लागले आहेत. प्रत्येक विधानसभा मतदारसंघात किमान वीस पत्रकार सक्रिय आहेत. प्रत्येक पत्रकाराच्या मोबाईलमध्ये दोन हजारापेक्षा अधिक नंबर असल्याने पत्रकारांचा गावातील सामान्य माणसापासून प्रमुखपर्यंतचा संपर्क असतो. प्रत्येक पत्रकाराने वैयक्तीक पातळीवर पाचशे मतदारांना जागृत केले तरी महाराष्ट्राच्या २८८ मतदारसंघातील तीस लाखापेक्षा अधिक मतांवर पत्रकारांचा सहजपणे प्रभाव पडतो, या वास्तवाची जाणीव पत्रकारांना होऊ लागली आहे. लोकशाहीत मतांच्या आकड्यांवरच सरकार बनत असेल आणि बनलेले सरकार न्याय देण्यासाठीही मतांचाच विचार करत असेल तर पत्रकारांनीही जागरुक होऊन विचार करावा अशा भावनाही समोर आल्या.

नागपूरपासून सुरू झालेल्या यात्रेला जागोजागी पत्रकारांनी उत्स्फुर्तपणे सहभाग नोंदवत स्वागत केले. एकीच्या शक्तीचे बळ किती असते? याचा प्रत्यय जिल्हा, तालुका, शहर पातळीवर पत्रकार एकजुटीने नारा देत आहेत. पत्रकार म्हणजे छोटा पॅकेट बडा धमाका हे वास्तव स्थानिक पातळीवरून समोर येवू लागले आहे. नागपूर, वर्धा, अमरावती, अकोला, शेगाव, जळगाव, धुळे ते शिर्डी प्रवासात गावपातळीवरील पत्रकारांनी विविध सामाजिक संघटना, राजकीय कार्यकर्ते यांना सहभागी करून पत्रकार यात्रेच्या पहिल्याच टप्यात लोकसंवादात परिवर्तन केले. सामान्य नागरिकांनीही उत्सुकता निर्माण झाल्याचे जागोजागी दिसून आले. सामान्य पत्रकारांना आपल्याकडे असलेल्या मतांच्या शक्तीची जाणीव होईल आणि ही यात्रा माध्यमक्षेत्राला अधिक सक्षम आणि प्रतिष्ठा मिळवून देण्यासाठी यशस्वी होईल अशी आशा आहे.

**- वसंत मुंडे**

■

# छ. संभाजीनगर



**डॉ. भागवत कराड**

(माजी केंद्रीय राज्यमंत्री)

**“वसंत मुंडे यांनी पत्रकार संवाद यात्रेच्या माध्यमातून पत्रकारांच्या मागण्या पहिल्यांदाच ऐरणीवर आणल्या आहेत. याबाबत मी मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांच्याशी बोलणार आहे. तसेच राज्यसभेत ‘झीरो अवर’ मध्ये पत्रकारांच्या मागण्यांबाबत आवाज उठवीन.”**





क्रांती चौकात वृत्तपत्र विक्रेत्यांच्या वतीने स्वागत...



वृत्तपत्र दिंडीत डॉ.भागवत कराड...



वृत्तपत्र दिंडीत सहभागी विक्रेते व पत्रकार...

पत्रकार संवाद यात्रेची माहिती देणाऱ्या पोस्टरचे मान्यवरांच्या हस्ते विविध ठिकाणी प्रकाशन केले. त्यातील ही निवडक छायाचित्रे.


केंद्रीय मंत्री ॲड.प्रतापराव जाधव


मंत्री मा.धनंजय मुंडे व मा.दिलीप वळसे पाटील


छ.संभाजीनगर येथे वृत्तपत्र विक्रेते


संपादक प्रवीण आहुजा


निफाड येथे उपनगराध्यक्ष अनिल कुंदे


निफाड पो.स्टे. चे पी.आय. गणेश गुरव


पारनेर येथे माहिती तंत्रज्ञान समिती प्रदेशाध्यक्ष जितेश सरडे, सुरेश खोसे पाटील

# छ. संभाजीनगर



दीक्षाभूमी ते मंत्रालय पत्रकार संवाद यात्रेच्या दुसऱ्या टप्प्यास छत्रपती संभाजीनगर येथून क्रांती चौकात वृत्तपत्र दिंडीने झाली. त्यानंतर पत्रकार भवनात पत्रकारांशी प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांनी संवाद साधला. यावेळी मोठ्या संख्येने पत्रकार उपस्थित होते.




पत्रकार परिषदेत जिल्हाध्यक्ष डॉ.प्रभू गोरे, शांताराम मगर, अनिल सावंत...



पत्रकार परिषदेत उपस्थित पत्रकार...



इलेक्ट्रॉनिक मीडिया प्रतीनिधी

# पत्रकार संवाद यात्रेस विविध संघटनांचा लेखी पाठिंबा



# गेवराई



**बीड जिल्ह्यातील गेवराई शहरात स्थानिक पत्रकारांनी शास्त्री चौकात संवाद यात्रेचे स्वागत केले. यावेळी पत्रकार व विविध सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते.**



स्थानिक माध्यमांशी बोलताना वसंत मुंडे...



शास्त्री चौकात स्वागत करताना तालुकाध्यक्ष अंकुश आतकरे, सुभाष सुतार...



सत्कार स्वीकारताना विश्वास आरोटे, वैभव स्वामी, अनिल सावंत

# स्थानिक वृत्तपत्रांचे पाठबळ



रविवार साप्ताहिक केसरी

सामान्य पत्रकारांच्या व्यथांची संवाद यात्रा!

राज्य लोकतंत्र

महाविद्यालये आणि आयटीआय संस्थांमध्ये वर्तमानपत्र खरेदीसाठी तरतूद करणार-मंत्री चंद्रकांत पाटील आणि मंगलप्रभात लोढा यांची घोषणा

लोकाशा

26AUG2024

महाविद्यालये आणि आयटीआय संस्थांमध्ये वर्तमानपत्र खरेदीसाठी तरतूद करणार- मंत्री पाटील

दैनिक वादळवारा

पत्रकार यांचे प्रश्न लवकरच मार्गी लावू: ना.चंद्रकांतदादा पाटील

शेतकऱ्यांचे वादळ

SHETKARYANCHE WADAL

पत्रकारांच्या मागण्या संदर्भात येत्या ८ दिवसात मुख्यमंत्र्यांशी चर्चा करून निर्णय घेऊ -ना.पाटील

तरुण भारत

सरकारचे कान, डोळे उघडे असतील तर २० तारखेला सामोरे येईल : वसंत मुंडे

छत्रपती संभाजीनगरातून पत्रकार संवाद यात्रेचा दुसऱ्या टप्प्याचा वृत्तपत्र दिंडीने प्रारंभ

रविवार साप्ताहिक केसरी

पत्रकारांची संपावी उपेक्षा... संवाद यात्रेची हीच अपेक्षा!

# बीड



**बीडमध्ये छत्रपती शिवाजी महाराज आणि अण्णा भाऊ साठे यांच्या पुतळ्यास अभिवादन करुन संवाद यात्रेचे सामाजिक न्याय भवनात स्वागत करण्यात आले. वृत्तपत्र विक्रेता संघटनेचे पदाधिकारी, संपादक-पत्रकारांच्या उपस्थितीत विक्रेत्यांना विमा प्रमाणपत्र वितरीत करण्यात आले.**






स्वागत करताना वृत्तपत्र विक्रेता संघटनेचे सुदाम चव्हाण, बेदरकर व वाघीरे...



विक्रेत्यांना विमा प्रमाणपत्राचे वितरण...





उपस्थित विक्रेते, पत्रकार...

# सामाजिक, राजकीय संघटनांचा संवाद यात्रेस पाठिंबा





# केज, पाली, चौसाळा



**बीड, पाली, मांजरसुंबा व चौसाळा आदी गावात यात्रेचे स्थानिक पत्रकारांनी स्वागत केले. विविध सामाजिक, राजकीय संघटनांचे पदाधिकारी, सरपंच पाठिंबा जाहीर करुन सहभागी झाले.**



मांजरसुंबा येथे स्वागत करताना अशोक काळकुटे...



पाली येथे स्वागत करताना ग्रामपंचात सदस्य



चौसाळा येथे ज्येष्ठ पत्रकार एन.टी.वाघमारे स्वागत करताना...

# माहिती पत्रकार संवाद यात्रेची, प्रकाशन झाले पोस्टरचे...



मनसे अध्यक्ष मा.राज ठाकरे व प्रभू गोरे



क्रीडामंत्री मा.संजय बनसोडे व अशोक देडे



अलिबाग माहिती अधिकारी आणि शैलेश पालकर



शिक्षणमंत्री मा.दिपक केसरकर व नीलेश सोमाणी



नागपूर येथे धार्मिक स्थळी प्रदीप शेंडे



जिल्हाध्यक्ष डॉ.प्रभू गोरे व त्यांची टीम



माजी पोलीस महासंचालक मा.संजयजी पांडे यांच्या हस्ते प्रकाशन झाले.
प्रदेश कार्याध्यक्ष प्रवीण सपकाळे, सचिन गोसावी, भूषण महाजन, आदी

# धाराशिव




**धाराशिव जिल्ह्यात प्रवेश केल्यानंतर संवाद यात्रेच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला अभिवादन करण्यात आले. स्थानिक पत्रकारांशी संवाद साधला. विविध राजकीय पक्ष-संघटनांच्या कार्यकर्त्यांनी यात्रेस जाहिर पाठिंबा दिला.**



धाराशिव जिल्हाध्यक्ष धनंजय पाटील, लातूर जिल्हाध्यक्ष अशोक देडे...



पत्रकारांना संबोधित करताना...



मान्यवरांकडून स्वागत स्वीकारताना...

# विविध स्थानिक दैनिकांनी पत्रकार संवाद यात्रेस दिलेली भरभरून प्रसिद्धी



# तुळजापूर



**तुळजापूर येथे तुळजाभवानी देवीचे दर्शन घेऊन यात्रेला सुरुवात झाली. शासकीय विश्रामगृहावर पत्रकार परिषदेत स्थानिक पत्रकारांनी स्वागत करून विविध विषयांवर चर्चा केली.**





स्वागत स्वीकारताना पदाधिकारी...



स्वागत करताना अरुण लोखंडे...



तुळजापूर शहरातील पत्रकार...

संवाद यात्रेच्या मार्गावर ठिकठिकाणी पोस्टरचे प्रकाशन करण्यात आले. यात्रेच्या दुसऱ्या टप्प्यातील काही निवडक छायाचित्रे.


मा.शरदचंद्र पवार व निळकंठ मोहिते


मंत्री मा.सुधीर मुनगुंटीवार व नीलेश सोमाणी


मंत्री मा.राधाकृष्ण विखे पाटील व निलेश सोमाणी


मा.खा.सुप्रिया सुळे व विश्वास आरोटे, दत्ता गाडगे


मा.आ.संजय शिरसाट व प्रभू गोरे, अनिल सावंत


मा.आ.यशोमती ठाकूर व नयन मोंढे, प्रवीण शेगोकार


पुणे येथे जिल्हाध्यक्ष राकेश वाघमारे

# सोलापूर



**सोलापूर शहरात श्रमिक पत्रकार संघात यात्रेचे ढोल ताशांच्या गजरात स्वागत केले. यावेळी पत्रकार परिषदेत स्थानिक पत्रकारांनी अनेक विषय मांडले.**




पत्रकार परिषदेत ज्येष्ठ पत्रकार दत्ता थोरे...



उपस्थित पत्रकार...



स्वागत करताना श्रमिक पत्रकार संघाचे पदाधिकारी...

# पत्रकारांच्या मागण्यांना वृत्तपत्रांच्या बातम्यांचे बळ



# पंढरपूर



**स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वसंध्येला पत्रकार संवाद यात्रेचे पंढरपूर शहरात आगमन झाले. स्थानिक शाळेत सकाळी ध्वजारोहण करण्यात आले. त्यानंतर स्थानिक पत्रकारांशी संवद साधला.**




पत्रकार परिषदेत पश्चिम महाराष्ट्र विभागीय कार्याध्यक्ष राजेंद्र कोरके पाटील...



उपस्थित पत्रकार...



ध्वजारोहणप्रसंगी बोलताना वसंत मुंडे...

## पत्रकारांची संवाद यात्रा महाराष्ट्रातील अशा प्रकारचा पहिलाच उपक्रम. यात्रेची माहिती देणाऱ्या पोस्टरचे मान्यवरांच्या हस्ते उत्साहाने प्रकाशन



विधानसभा उपाध्यक्ष मा.नरहरी झिरवळ



------------




प्रकाशन करताना दत्ता गाडगे व स्थानिक पत्रकार



ठाणे जिल्हा माहिती अधिकारी मनोज सानप



दै.सकाळचे संपादक संतोष शाळिग्राम व प्रभू गोरे



ठाणे महापालिकेत प्रकाशन करताना अतिरिक्त आयुक्त, विभागीय अध्यक्ष नितीन शिंदे

# सांगोला



**मा. आमदार शहाजीबापू पाटील**

''समाजात नेमकं काय चाललंय, राजकारणी लोकांची दिशा कोणती, हे सगळं वर्तमानपत्रांमुळेच जनतेपुढे येत असतं. तुम्ही जागृती करता. तुमची तुलना बुलडोझरशीच केली पाहिजे. आडवं येईल ते सगळं चिरडून पुढे जायचं! संवाद यात्रेने पत्रकारांचे प्रश्न चर्चेत आले आहेत. सरकारला दुर्लक्ष करता येणार नाही.''





आमदार शहाजीबापू यांच्या समवेत...



शहरात स्वागत स्वागत करताना सतीश सावंत...



यात्रेचे वाजत-गाजत स्वागत...

# व्यवसायबंधूंच्या मागण्यांना इलेक्ट्रॉनिक, डिजिटल मीडीयाचा पाठींबा



# सांगली



**मा. संजय भोकरे**

"महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांनी संवाद यात्रेच्या माध्यमातून राज्य पिंजून काढत पत्रकारांमध्ये आत्मविश्वास निर्माण केला आहे. संघटनेमुळेच न्याय मिळतो. हे पत्रकारांनी लक्षात ठेवावे."



स्वागत करताना संजय भोकरे, सिद्धार्थ भोकरे, प्रताप मेटकरी...



संवाद साधताना...



उपस्थित पत्रकार...


# जाहीर पत्रकाद्वारे संवाद यात्रेस संघटनांचा पाठिंबा



Unmesh Bhaiyyasaheb Patil



















# कोल्हापूर



कोल्हापूर शहरात राजर्षी शाहू महाराज यांच्या पुतळ्यास अभिवादन केल्यानंतर यात्रेचे मोठ्या जल्लोषात स्वागत करण्यात आले. सायंकाळी पत्रकार भवनात आणि सकाळी राज्य पत्रकार संघाच्या कार्यालयात स्थानिक पत्रकारांशी प्रदीर्घ वार्तालाप झाला.






पत्रकार संघात बोलताना वसंत मुंडे...



स्वागत करताना बाजीराव फराकटे, श्रेयश भगत...



राज्य पत्रकार संघात स्वागत करताना जिल्हाध्यक्ष चंद्रकांत पाटील...

# स्थानिक माध्यमांकडून मिळालेला वृत्त-पाठिंबा



# शिराळा



**मा. आ. सदाभाऊ खोत**

**''पहिल्यांदाच निघालेल्या पत्रकार संवाद यात्रेने राज्यातील पत्रकारांमध्ये संवाद पूल बांधला गेला हे मोठे यश वाटते. वसंत मुंडे हे पत्रकार आणि चळवळीतला कार्यकर्ता असल्याने राज्यातील पत्रकारांनी त्यांच्याबरोबर राहावं, साथ द्यावी, असं मी नक्कीच सांगीन.''**





आ.सदाभाऊ खोत यांच्याकडून स्वागत...



आ.सदाभाऊ खोत व वसंत मुंडे...



पत्रकार संवाद यात्रेचे स्वागत...

# स्थानिक माध्यमांचा भरभरून प्रतिसाद



# कराड



**महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांचे समाधिस्थळ प्रीतिसंगम येथे अभिवादन केले. त्यानंतर कराड शहरात स्थानिक पत्रकार, विविध राजकीय संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी स्वागत केले. विश्रामगृहावर पत्रकारांशी मुक्त संवाद झाला.**



कराड येथील प्रीतिसंगम येथे अभिवादन...



स्वागत करताना जिल्हाध्यक्ष प्रवीण कांबळे, अमित खाडे...



प्रीतिसंगम येथे...

# तळबीड



**तळबीड येथील सेनापती हंबीरराव मोहिते यांच्या समाधिस्थळी आरती करण्यात आली. त्यांनातर ग्रामपंचायतीमध्ये पदाधिकाऱ्यांनी स्वागत करून जाहीर पाठिंबा दिला.**





तळबीड ग्रामपंचायतीत स्वागत करताना ग्रामस्थ...



स्वागत करताना प्रवीण कांबळे व सहकारी...



विविध सामाजिक संघटनांच्या पदाधिकाऱ्यांकडून स्वागत...

# कराड



**मा.भरतनाना पाटील**
(प्रदेश सरचिटणीस भाजपा)

**“पत्रकार हा समाजातील प्रमुख घटक आहे. या घटकाचे प्रश्न घेऊन निघालेल्या संवाद यात्रेने सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे. पत्रकारांच्या मागण्या सरकारपर्यंत पोहोचवू व मागण्या मान्य व्हाव्यात यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करू.”**



माजी आमदार मा.आनंदराव पाटील, रमेश लवटे...



कराड शहरातील उपस्थित पत्रकार...



सामाजिक संघटनांचा पठिंबा स्वीकारताना विश्वास आरोटे, अमित खाडे, प्रवीण कांबळे

# नागठाणे




**नागठाणे येथे स्वामी विवेकानंद यांच्या पुतळ्यास अभिवादन केल्यानंतर आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स महाविद्यालयात प्राध्यापक, पत्रकार यांनी स्वागत करून संवाद साधला.**





महाविद्यालयात बोलताना वसंत मुंडे, व्यासपीठावर उपस्थित मान्यवर...



प्रजापिता ब्रह्मकुमारी राखी बांधताना सोबत तालुकाध्यक्ष दत्ता घाडगे...



स्वागत करताना पोलीस अधिकारी...

# उंब्रज



**मा. धैर्यशील कदम**

"ग्रामीण पत्रकारांना आर्थिक स्थैर्य किंवा सुरक्षितता मिळत नाही. केवळ शाब्दिक कौतुक करून त्यांचे पोट भरत नाही. सरकारकडून योजनेच्या माध्यमातून आधार मिळाला पाहिजे. वसंत मुंडे यांनी पत्रकार संवाद यात्रेच्या माध्यमातून मागण्यांना वाचा फोडल्याने यश मिळेल. सरकारकडे आम्हीही पाठपुरावा करू."





पत्रकार परिषदेत बोलताना वसंत मुंडे...



उपस्थित पत्रकार...



स्वागत करताना धैर्यशील कदम...

# फलटण



**क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या पुतळ्यास अभिवान करून शहरात यात्रेचे आगमन झाले. स्थानिक पत्रकारांनी जल्लोषात स्वागत करून विश्रामगृहावर संवाद साधाला.**



फलटण येथे बोलताना वसंत मुंडे...



शहरात स्वागत स्वागत करताना ज्येष्ठ पत्रकार रमेश आढाव, गोविंद मोरे...



लोणंद येथे संपादक मुजीब शेख, चंदन पठाण यांनी स्वागत केले...

# बारामती



**आमदार दत्तात्रेय भरणे**

**''ग्रामीण भागातील पत्रकार कठीण परिस्थितीत काम करतात याची जाणीव सर्वांना आहे. वसंत मुंडे यांनी या सामान्य पत्रकारांसाठी थेट संवाद यात्रा काढून लक्ष वेधून घेतले आहे. कोरोनाच्या काळात इंदापूरमधील पत्रकारांनी खूप मोठे काम केले.''**





स्वागत करताना आमदार दत्तामामा भरणे, प्रवीणभैया माने, निळकंठ माहिते...



बारामती अध्यक्ष संतोष जाधव, विश्वास आरोटे...



स्वागत करताना स्थानिक कलाकार...

# बारामती




**बारामती येथे पत्रकार संवाद यात्रेचे आगमन झाले. तालुक्यातील पत्रकारांनी उपस्थित राहून स्वागत केले. स्थानिक लोकप्रतिनिधी व पदाधिकाऱ्यांनी आपला पाठिंबा दिला.**



पत्रकारांशी संवाद साधताना...



बारामती तालुक्यातील पत्रकारांसमवेत...




पुणे ग्रामीण जिल्हाध्यक्ष निळकंठ मोहिते, संतोष जाधव, सागर शिंदे...

# हडपसर



**पुणे शहरातील हडपसर भागात संवाद यात्रेचे स्थानिक पत्रकार व राजकीय संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी मोठ्या जल्लोषात स्वागत केले. सभागृहात पत्रकार व स्थानिकांशी मुक्त संवाद झाला.**



हडपसर येथे स्वागत समारंभात बोलताना वसंत मुंडे...



स्वागत करताना शहर जिल्हाध्यक्ष राकेश वाघमारे...



राकेश वाघमारे, विश्वास आरोट, प्रवीण सपकाळे, भूषण महाजन...

# पिंपरी चिंचवड



**आमदार अण्णा बनसोडे**

**पुणे-पिंपरी चिंचवड भागात यात्रेचे जल्लोषात स्वागत करण्यात आले. स्थानिक आमदार अण्णा बनसोडे आणि शिवसेनेचे राज्य संघटक मा. गोविंद घोळवे यांनी उपस्थित राहून पाठिंबा दिला.**




कार्यक्रमात बोलताना वसंत मुंडे...



पिंपरी चिंचवड येथे स्वागत करताना प्रदेश उपाध्यक्ष नितीन शिंदे, पराग कुंकुलोळ...



स्थानिक पत्रकारांसमवेत पुणे ग्रामीण जिल्हाध्यक्ष संजोग काळदंते, अतुल क्षीरसागर...

# खोपोली



**डॉ. सुनील पाटील**

**पत्रकारांच्याही समस्या असतात आणि त्या सरकारने सोडवल्या पाहिजेत यासाठी आमचा पूर्णपणे पाठिंबा राहील. संवाद यात्रेच्या माध्यमातून पत्रकारांच्या एकजूटीचं दर्शन होत असून या घटकाचे प्रश्न सुटावेत.**





स्वागत करताना डॉ.सुनील पाटील, रायगड जिल्हाध्यक्ष राकेश खराडे...



ज्येष्ठ पदाधिकारी शैलेश पालकर, खालापूर ता.अध्यक्ष राहुल जाधव...



स्थानिक पत्रकारांकडून स्वागत...

# पनवेल



**मुंबईच्या प्रवेशद्वारावर पनवेल (जि.रायगड) येथे पत्रकार संवाद यात्रेचे स्थानिक पत्रकारांनी मोठ्या जल्लोषात स्वागत केले. पत्रकार परिषदेत ग्रामीण, शहरी भागातील पत्रकारांनी उपस्थित राहून मुक्तपणे संवाद साधला.**




पनवेल येथे पत्रकार परिषदेत बोलताना वसंत मुंडे...




स्वागत करताना शैलेश पालकर, शैलेश चव्हाण, सुनील पाटील...



उपस्थित पत्रकार...

# पनवेल



**माजी खासदार रामशेट ठाकूर**

**पनवेल येथे रामशेट ठाकूर यांनी भेट घेऊन पत्रकारांच्या मागण्यांना पाठिंबा दिला. पत्रकारांच्या न्याय्य मागण्यांसाठी निघालेली संवाद यात्रा यशस्वी होईल. पत्रकारांसाठी विकास महामंडळ स्थापन व्हावे अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.**





पनवेल महापालिकेचे विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे...



वाजत-गाजत स्वागत...



खालापूर येथे स्वागत करताना स्थानिक पत्रकार...

# नवी मुंबई




**नवी मुंबई येथे संभाजी ब्रिगेड, विधी संघटना यांच्यासह अनेक सामाजिक संघटनांनी व पत्रकारांनी यात्रेचे स्वागत केले. यावेळी नागरिकांनी व संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी संवाद यात्रेमागची भूमिका समजावून घेतली.**






संभाजी ब्रिगेडचे शिवश्री मारुती खुटवड, नवी मुंबई अध्यक्ष दशरथ चव्हाण...



नवी मुंबई येथे बोलतना प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे...




ॲड.सोमनाथ गायकवाड व शिवश्री मारुती खुटवड...

# ठाणे



**ठाणे शहरात छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास अभिवादन करुन यात्रेला सुरुवात झाली. स्थानिक पत्रकार व सामाजिक संस्थांच्या पदाधिकाऱ्यांनी सहभागी होऊन यात्रेत उत्साह वाढवला.**





ठाणे शहरात पुष्पवृष्टी करत यात्रेचे स्वागत केले...



समाजसेवक नानजीभाई, कोकण विभागीय अध्यक्ष नितीन शिंदे...



स्थानिक पत्रकारांसमवेत गुरुद्वारामध्ये...

# पत्रकारांच्या कथा-व्यथांची संवाद यात्रा!

पत्रकार परिषदेत ज्येष्ठ पत्रकार सांगू लागले. वय ७० झाले, कोणी काम देत नाही, दिले तरी प्रकृतीमुळे करणे शक्य नाही. बाळशास्त्री जांभेकर सन्मान निवृत्ती योजनेतील प्रस्ताव चार वर्षांपासून त्रुटीत अडकून आहे. आयुष्यभर निष्ठेने, प्रामाणिकपणे काम करून पदरी काय? असा प्रश्न उपस्थित केला तेव्हा माध्यम क्षेत्रातील निवृत्त झालेल्यांचे काय हाल आहेत? याचे भयान वास्तव समोर आले. तर अनेक ठिकाणी खरे लिहिल्यानंतर थेट गुन्हा दाखल करून कसे अडचणीत आणले गेले? या घटना सांगताना कोणत्या प्रसंगांना सामोरे जावे लागले याचे भयान चित्रच उभे राहिले. माध्यम समुहाकडूनही आता मानधन मिळत नाही. जाहिरातीही मिळत नाहीत. सरकारकडून कोणताच आधार नाही. अशा परिस्थितीतून होणारी आर्थिक कोंडी सांगताही येत नाही आणि सहनही होत नाही अशी झाली आहे. आपली व्यथा मांडायची कोणाकडे? अशा प्रश्नांनी व्याकुळ झालेले अनेकजण बोलते झाले. तर काही ठिकाणी मोबाईल हातात असल्याने चुकीच्या गोष्टी वाऱ्याच्या वेगाने पसरतात. त्याचा प्रामाणिकपणे काम करणाऱ्या पत्रकारांसह यंत्रणेला, समाजाला कसा त्रास होतो? आशा घटनांचे दाखले देत मांडले. तर चार चाकी, दुचाकीवर प्रेस लिहून पोलिसांनाच कशा दमदाटीचा सामना करावा लागतो याचे अनेक किस्सेही यंत्रणेतील आणि पत्रकारांनी सांगितले तेव्हा संविधानिक पध्दतीने माध्यम क्षेत्रासाठी स्टेट प्रेस कौन्सिल निर्माण व्हावी हा विचार पुढे आला.

दीक्षाभूमी ते मंत्रालय पत्रकार संवाद यात्रेचा दुसऱ्या टप्प्याची सुरुवात छत्रपती संभाजीनगर येथील क्रांती चौकातून वृत्तपत्र विक्रेत्यांनी वृत्तपत्र दिंडी काढून केली. तरुण पत्रकार ज्यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून पत्रकारितेमध्ये येतात त्यांची निवृत्तीनंतर काय अवस्था होते हे समोर यते तेव्हा या क्षेत्रातील भयान वास्तवाची जाणीव होते. पत्रकारांनी अर्धसत्य मांडू नये असा सल्ला बरेच विद्वान देतात. पण खरे लिहिल्यानंतर कोणत्या प्रसंगांना सामोरे जावे लागते याच्या अनेक कथा बीड, धाराशिव, पंढरपूर, सांगोला येथील पत्रकारांनी मांडल्या. तेंव्हा माध्यम संस्थेने 'तुच चुकला असशील' असे बक्षीस देवून हात झटकले. तर पत्रकारांकडून सदा सत्याची अपेक्षा करणारा कोणीही मदतीला धावला नाही हे एक आणखी सत्य. मग या पवित्र क्षेत्रात प्रामाणिकपणे काम करणाऱ्यांची संख्या आता कमी झाली आहे. असा कांगावा करणाऱ्यांनी कधीतरी अडचणीत आणल्या गेलेल्या पत्रकाराला समजून घेतले आहे का? पत्रकार संरक्षण कायद्याची अंमलबजावणीच होत नाही. उलट बातमी प्रसिध्द केली, दाखवली की थेट पत्रकारावरच अनेक ठिकाणी गुन्हे दाखल झाले आहेत. संवाद यात्रेत पत्रकार मनमोकळेपणे बोलू लागले. गावोगावी पत्रकार समस्या मांडत होते व त्यावर उपायही सांगत होते.

धुळ्यामध्ये एका ज्येष्ठ संपादकाने कोरानानंतर परिस्थिती बदलली पण वृत्तपत्रांच्या खपाबाबतचे धोरण जुनेच असल्यामुळे जिल्हा माहिती कार्यालयात कशा पद्धतीने पिळवणूक होते हे स्पष्टपणे सांगितले. सर्व क्षेत्रांना शिथीलता दिली असताना वर्तमानपत्रांना का नाही? असा प्रश्न त्यांनी उभा केला. आपल्या जगण्यातील, व्यवसायातील समस्या हा या यात्रेचा मुख्य विषय आहे हे पटल्याने पत्रकार मोठ्या संख्येने गावोगावी सहभागी झाले. पत्रकारांना सर्रास चाय-बिस्कुटवाले, बदमाश, पैसे खाणारे आसा आरोप करत प्रमाणिकपणे काम करणारांना पिसवले जाते. या क्षेत्रात प्रामाणिकपणे काम करणारांना एक तर बदनाम केले जाते किंवा माध्यम समुहच गळाला लावला जातो. अशा परस्थितीत पत्रकारांनी करायचे काय? हा प्रश्न जागोजागी उभा राहिला.

२४ दिवसाच्या प्रवासात काही ठिकाणी रात्री उशिरा मोठ्या माध्यम समुहातील संपादक, व्यवस्थापकीय विभागातील अनेकजण येऊन भेटले. त्यांनी आपल्या व्यथाही मांडल्या. मात्र आम्ही उघडपणे बोलू शकत नाही ही हतबलता व्यक्त केली. केंद्र व राज्य सरकारच्या अर्थसंकल्पात माध्यम घटकासाठी एक रूपयाचीही तरतूद नसते. याबाबत जागोजागी प्रश्न उपस्थित केल्यानंतर पत्रकार व संपादकांनी समर्थन देत पत्रकार, वृत्तपत्र विक्रेते आणि एकूणच माध्यम घटकात काम करणाऱ्यांसाठी स्वतंत्र आर्थिक विकास महामंडळ स्थापन झाले पाहिजे. या मागणीवर जोर दिला. शासन व्यवस्था प्रत्येक घटकाला न्याय देताना मतांच्या गठ्ठ्याचा विचार करूनच निर्णय घेणार असेल तर पत्रकारांनाही आता आपल्याकडील मतांचा गठ्ठ्याचा विचार करावा लागेल. हा विचार जागोजागी पुढे आला. सांगली, कोल्हापूर, सातारा, बारामती, पुणे, रायगड, ठाणे या भागातील शहरी आणि ग्रामीण पत्रकारांनी ठिकठिकाणी स्वागत कले.

मुंबईत यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या सभागृहात राज्यभरातून, मोठ्या संख्येने उपस्थित राहिले. ऐन वेळी दिल्ली दौऱ्यामुळे मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांना उपस्थित राहणे शक्य झाले नाही. त्यामुळे सरकारच्यावतीने ज्येष्ठ मंत्री चंद्रकांत दादा पाटील, मुंबईचे पालकमंत्री मंगलप्रभात लोढा यांनी येवून निवेदन स्वीकारले व मुख्यमंत्री व दोन्ही उपमुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत बैठक घेवून पत्रकारांच्या मागण्यांवर तत्काळ निर्णय घेतला जाईल अशी ग्वाही दिली.

दीक्षाभूमी नागपूर येथून मंत्रालय मुंबईपर्यंत २४ दिवसाच्या प्रवासात २७ जिल्ह्याच्या ठिकाणी दिडशेपेक्षा अधिक तालुक्यातून साडेपाच हजार कि.मी. चा प्रवास करताना या यात्रेने माध्यम क्षेत्रातील मुलभूत समस्या ऐरणीवर आणल्या. संवाद यात्रेनंतर काय? या प्रश्नावर ३६५ दिवसामध्ये फक्त एक प्रश्न आपल्या समस्यांसाठी शासन व्यवस्थेला विचारावा ही भूमिका पत्रकारांमध्ये रुजली. लोकांचे प्रश्न मांडणारे पत्रकार उघडपणे आपल्या व्यथा मांडू लागले, सरकारी व्यवस्थेला आपले प्रश्न विचारते झाले. त्यामुळे भविष्यात राजकीय व्यवस्थेला माध्यम क्षेत्रातील मागण्यांकडे दुर्लक्ष करता येणार नाही. हा विश्वास संवाद यात्रेने पत्रकारांमध्ये निर्माण केल्याचे जाणवले याचे समाधान वाटले.

**- वसंत मुंडे**

# धन्यवाद !